RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ९, अंक ३४] बुधवार, मार्च १५, २०२३/फाल्गुन २४, शके १९४४ [पृष्ठे ८, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ८१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ मार्च, २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३.**

क्रमांक कृबास-१२२२/प्र.क्र.६३६/२१-स.-महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा महा. २०) याच्या कलम ६० च्या पोट-कलम (१) व पोट-कलम (२) च्या खंड (ड) व (यु) यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, हरकती व सूचना विचारात घेतल्यानंतर, **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण, भाग-४ब, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ यामध्ये प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्रमांक कृबास-१२२२/प्र.क्र. ६३६/२१-स, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ यास अनुसरुन महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करील आहे :—

१. या नियमांस, महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) (दुसरी सुधारणा) नियम, २०२३ असे म्हणावे.

२. मुख्य नियमाच्या नियम ३ मध्ये, खंड (पाच) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

“ (सहा) बाजार क्षेत्रात लागू करावयाची आचारसंहिता विहित करणे. ”.

३. मुख्य नियमाच्या नियम ७ मधील, पोट-नियम (१) मध्ये, “ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रारुप मतदार यादीत ज्याचे नाव असेल अशा कोणत्याही सदस्यास ” या मजकुरानंतर “ किंवा कोणत्याही शेतकऱ्यास किंवा जी व्यक्ती बाजार समितीची निवडणूक लढवण्यास पात्र असल्याचा दावा करते अशा कोणत्याही व्यक्तीस ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

४. मुख्य नियमांच्या नियम ८ मध्ये, पोट-नियम (३) मधील,-

(अ) “ नियम ७क च्या पोट-नियम (३)” या मजकूराऐवजी “नियम ७ च्या पोट-नियम(३)” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ब) नियम ८ च्या पोट-नियम (३) नंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल.

" परंतु अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये निवडणूक लढवणारा कोणत्याही उमेदवार, त्याचे नाव मतदार यादी मध्ये नाही या कारणावरून निवडणूक लढवण्यास अपात्र आहे असे समजण्यात येणार नाही.

**५.** मुख्य नियमाच्या नियम ९ मधील.—

(अ) पोट-नियम (१) नंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येतील.—

" परंतु, अधिनियमाच्या कलम १३च्या पोट-कलम (१)च्या खंड(अ) अन्वये निवडणूक लढविण्याच्या प्रयोजनार्थ उमेदवार बाजार क्षेत्रात, किमान १० आर जमीन धारण करील आणि बाजार क्षेत्रात निवडणूक घोषित झाल्याच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या पाच वर्षामध्ये त्याने किमान तीन वेळा संबंधित बाजार क्षेत्रात त्याच्या अधिसूचित कृषी उत्पन्नाची विक्री केलेली असणे आवश्यक असेल आणि त्याचे नाव मतदार यादीत असण्याची गरज असणार नाही.

" परंतु, आणखी असे की, अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१)च्या खंड(अ) अन्व्ये निवडणूक लढविण्याच्या प्रयोजनार्थ, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारासाठी वरील परंतुकांमध्ये विनिर्दिष्ट केलेली अधिसूचित कृषी उत्पन्नाची विक्री करण्याबाबतची पात्रता, महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) (दुसरी सुधारणा) नियम, २०२३ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून पाच बाजार वर्षाच्या कालावधीत घेण्यात येणाऱ्या कोणत्याही निवडणुकीसाठी लागू असणार नाही."

(ब) पोट-नियम (३) वगळण्यात येईल.

**६.** मुख्य नियमाच्या नियम २० मधील, पोट-नियम(४) मध्ये, " कोणत्याही मतदारास " या मजकुरानंतर " बाजार क्षेत्रात राहणाऱ्या शेतकऱ्यास ", हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**७.** मुख्य नियमाच्या नियम २१ मध्ये, पोट-नियम (४) मधील विद्यमान परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, आणखी असे की, अधिनियमाच्या कलम १३ पोट-कलम (१) च्या खेड (अ) अन्वये निवडून द्यावयाच्या पंधरा शेतकरी प्रतिनिधींच्याबाबतीत, उमेदवाराच्या मतदार यादीतील नावाची खात्री करण्याची आवश्यकता असणार नाही.".

**८.** मुख्य नियमाच्या नियम २७ मध्ये,

पोट-नियम(१) मध्ये "नामनिर्देशनपत्र फेटाळण्याबाबतच्या" या मजकुराऐवजी " नामनिर्देशनपत्राचा स्वीकार करण्याबाबतच्या किंवा ते फेटाळण्याबाबतच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**९.** मुख्य नियमाच्या नियम २८ मधील,

पोट-नियम(१) मध्ये "निवडणूक" निर्णय अधिकाऱ्याकडे या मजकुरानंतर " नमुना ७अ मध्ये " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**१०.** मुख्य नियमाच्या नियम ६७ नंतर, पुढील पोट-नियम समाविष्ट करण्यात येईल.

" **६७अ.** उमेदवाराकडून कलेल्या निवडणूक खर्च.-(१) निवडणुकीतील प्रत्येक उमेदवार, निवडणूक घेण्याच्या आदेशाची तारीख आणि तिच्या निकालाची तारीख या दोन्ही तारखा धरुण त्या दरम्यान एकतर स्वतः किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत निवडणुकीशी संबंधित केलेल्या किंवा प्राधिकृत केलेल्या खर्चाचा स्वतंत्र व अचूक हिशेब ठेवील.

(२) या हिशेबात/लेख्यात नियम ६७ क मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील अंतर्भूत असेल.

(३) उक्त एकूण खर्च हा, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

(४) निवडणूक लढविणरा प्रत्येक उमेदवार, त्याच्या निवडणूक खर्चाचा हिशेब, नियम ६७क मध्ये विहित केलेल्या मुदतीत व रीतीने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यामार्फत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे दाखल करील.

**६७ब.** निवडणूक खर्चाचा हिशेब दाखल करण्यास अपयशी असल्यास ठरल्यास, अपात्र ठरविणे,-जर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची,–

(अ) नियम ६७अ व नियम ६७क द्वारे आवश्यक केलेल्या मुदतीत व रीतीने निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यास कसूर केली आहे, आणि

(ब) कसुरी बाबत कोणतेही समाधानकारक किंवा योग्य समर्थन नाही याबद्दल जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर,

जिल्हा निवडणूक अधिकारी, संचालकास अहवाल सादर करील आणि असा अहवाल प्राप्त होताच संचालक, संबंधितास त्यांचे म्हणने ऐकून घेण्याची संधी दिल्यानंतर, बाजार समितीचा सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र असल्याचे आदेशाद्वारे घोषित करील आणि अशा कोणत्याही व्यक्तीस आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षे इतक्या कालावधीसाठी अपात्र ठरवण्यात येईल.

**६७क.** निवडणूक खर्चाच्या हिशोबाचा तपशील,

(१) नियम ६७अ अन्वये उमेदवाराकडून अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीकडून ठेवण्यात यावयाच्या निवडणूक विषय खर्चाच्या लेख्यात/हिशोबात दिवसागणित होणाऱ्या खर्चाच्या प्रत्येक बाबी या संबंधातील पुढील तपशील अंतर्भूत असतील—

(अ) ज्या दिनांकाला खर्च करण्यात अथवा तो प्राधिकृत करण्यात आला असेल तो दिनांक—

(ब) खर्चाचे स्वरुप (उदाहरणार्थ- प्रवास, टपाल किंवा मुद्रण व तत्सम खर्च)

(क) खर्चाची रक्कम

(एक) दिलेली रक्कम

(दोन) अदत्त रक्कम

(ड) प्रदानाची तारीख

(इ) आदात्याचे नाव व पत्ता

(फ) दिलेल्या रक्कमेच्या बाबतीत, प्रमाणकाचा अनुक्रमांक

(ग) रक्कम अदत्त असेल त्याबाबतीत, कोणतेही असल्यास, देयकांचा अनुक्रमांक

(ह) जिला अदत्त रक्कम देय असेल त्या व्यक्तीचे नाव व पत्ता

(२) प्रत्येक निवडणूक लढविणारा उमेदवार, निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत, निवडणूक खर्चाचा हिशेब निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करील.

(३) उमेदवाराकडून किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधीकडून प्रदानाच्या तारखेनुसार लावलेल्या व अनुक्रमांकानुसार अनुक्रमाने दिलेल्या निवडणुकीच्या खर्चाच्या लेख्यासह सर्व प्रमाणके दाखल करण्यात येतील आणि असे अनुक्रमांक, पोट-नियम(१) च्या बाब (फ) खालील लेखात नमूद करण्यात येतील.

(४) ज्या खर्चाची प्रमाणके मिळवण्यात आली नसतील अशा खर्चाच्या बाबीसंबंधात पोट-नियम(१) च्या बाब (इ) मध्ये नमूद केलेले तपशील देणे आवश्यक असणार नाही.

**६७ ड.** हिशेब तपासण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने नोटीस देणे—

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास, नियम ६७ अ अन्वये उमेदवाराकडून निवडणूक विषयक खर्चाचा हिशेब सादर करण्यात आल्याच्या तारखेपासून दोन दिवसात, त्याच्या सूचना फलकावर नोटीस लावून घेण्याची व्यवस्था करता येईल, ती मध्ये,—

(अ) ज्या तारखेला हिशेब सादर करण्यात आला ती तारीख

(ब) उमेदवारांचे नाव, आणि

(क) ज्या ठिकाणी अशा हिशोबाची तपासणी करता येईल ते ठिकाण व वेळ निर्दिष्ट करण्यात येईल. ”.

**११.** मुख्य नियमांस जोडलेल्या नमुना ७ मध्ये, खंड (६) मधील, उप-खंड (तीन) नंतर पुढील मजकूर जादा दाखल करण्यात येईल :—

अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये, (अ) सहकारी संस्थांचा मतदारसंघ किंवा (ब) ग्रामपंचायतीचा मतदार संघ या मतदार संघातून निवडणूक लढवणाऱ्या शेतकरी उमेदवारांना खंड (दोन) व (तीन) लागू होणार नाहीत.

**१२.** मुख्य नियमांस जोडलेल्या नमुना ७ नंतर पुढील नमुना ७ अ समाविष्ट करण्यात येईल.

**नमुना ७ अ**

**(नियम २८(१) पाहा)**

**उमेदवारी मागे घेण्याबाबत नोटीस**

.................................................. कृषि उत्पन्न बाजार समिती, ..................................................

तालुका .............................. जिल्हा .............................. च्या समितीवरील ..............................

मतदारसंघातील निवडणूक.

**प्रति,**

निवडणूक निर्णय अधिकारी,

मी, .................................................................................................................... वरील निवडणूकीतील

उमेदवार, याद्वारे नोटीस देत आहे की, मी माझी उमेदवारी मागे घेत आहे.

ठिकाण : ..............................

उमेदवाराची सही

दिनांक :

ही नोटीस मला माझ्या कार्यालयात, .................................................. (वेळ) वाजता दिनांक .................................................. रोजी

.................................................. (नाव), * यांच्याकडून देण्यात आली.

दिनांक :

..............................

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची सही.

**उमेदवारी मागे घेण्याची नोटीस मिळाल्याची पोचवती**

**(नोटीस पोहोचविणाऱ्या व्यक्तीच्या स्वाधीन करावयाची)**

.................................................................................................................... कृषि उत्पन्न बाजार

समितीवरील .............................................. मतदारसंघातील निवडणूकीतील उमेदवार ..............................................

.................................................................. यांनी दिलेली, उमेदवारी मागे घेण्याबाबतची नोटीस मला माझ्या कार्यालयात

दिनांक .................... राजी .................... वाजता * .................................................. यांच्याकडून देण्यात आली.

दिनांक :

..............................

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची सही.

* येथे योग्य असेल त्याप्रमाणे पुढीलपैकी एक पर्याय दाखल करावा :

१. उमेदवार

२. ही नोटीस देण्यासाठी जिला उमेदवाराकडून लेखी स्वरूपात प्राधिकृत करण्यात आले आहे अशी उमेदवाराची सूचक व्यक्ती.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**डॉ. सुग्रीव संभाजी धपाटे,**

शासनाचे सहसचिव.

## CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the15th March, 2023.

*NOTIFICATION*

**MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.**

No. KBS-1222/C.R.636/21-C. — In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clauses (*d*) and (*u*) of sub-section (*2*) of section 60 of the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Act, 1963 ( Mah. XX of 1964), and of all other powers enabling in that behalf, the Government of Maharashtra hereby, after consedering objection and suggestions, pursuant to the Government Notification, Co-operation, Marketing and Textiles Department, No. KBS-1222/C.R. 636/21-C, dated the 27th February 2023, published in the Maharashtra Government Gazette, Extraordinary, Part IV-B, dated 27th February 2023, makes the following rules further to amend to the Maharashtra Agricultural Produce Market Committee (Election to Committee) Rules, 2017, namely :-

**1**. These rules may be called the Maharashtra Agricultural Produce Market Committee (Election to Committee) (Second Amendment) Rules, 2023.

**2**. In rule 3 of the principal Rules, after clause (*v*), the following clause shall be inserted, namely :-

"(vi) to prescribe the code of conduct to be implemented in the market area of Market Committee.".

**3**. In rule 7 of the principal Rules, in sub-rule(*1*), after the words "Market Committee" the words "or by any agrilcuturist or any person who claims to be eligible for contesting the election to Committee" shall be inserted.

**4.** In rule 8 of the principal rules, in sub- rule (*3*),—

(*a*) for the words, figures, brackets and letter "sub-rules (*3*) of rule 7(*a*)", the words, figures and brackets "sub-rule (3) of rule 7" shall be substituted;

(*b*) the following proviso shall be added, namely :—

provided that, any candidate contesting election under clause (*a*) of sub-section (*1*) of section 13 shall nat be considered to be disqualified for the reason that his name does not appear in the Voters' list.

**5**. In rule 9 of the principal Rules,—

(*a*) to sub-rule (1), the following provisos shall be added, namely, :-

"Provided that, for the purpose of contesting election under clause (*a*) of sub- section (*1*) of section 13, the candidate shall hold minimum 10R of agricultural land in the market area and must have sold his notified agricultural produce at least three times in the preceding five market years before the date of declaration of election in the market area and it shall not be required that his name appears in the Voters' list :

Provided further that, the qualification specified in the above proviso for the purpose of contesting election under clause (*a*) of sub-section (*1*) of section 13, regarding sale of notified agricultural produce shall not be applicable in any election conducted during the period of five market years from the date of commencement of the Maharahtra Agricultural Produce Market Committee (Election to Committee) (Second Amendment) Rules, 2023;

(*b*) sub-rule (*3*) shall be deleted.

**6.** In rule 20 of the principal Rules, in sub-rule *(4)*, after the works "to any voter" the words "or nnto any agriculturist residing in that area," shall be inserted.

**7.** In rule 21 of the principal Rules, in Sub-rule *(4)*, after the existing proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided further that, in case of election of fiften agriculturists under clause *(a)* of sub-section *(1)* of section 13, it shall not be required to verify the name of the candidate from the Voters' list.".

**8.** In rule 27 of the principal Rules, in sub-rule *(1)*, for the word "rejecting", the words "accrpting or rejecting" shall be substituted.

**9.** In rule 28 of the principal Rules, in sub-rule *(1),* after the words "Returning Officer" the words "in Form No. 7A" shall be inserted.

**10.** After rule 67 of the principal Rules, the following rules shall be inserted, namely :—

**"67A.** *Election expenses by the Candidate,— (1)* Every candidate at an election shall either by himself or by his Election Agent keep a separate and correct account of all expenditure in connection with the election incurred or authorized by him or by his Election Agent between the date of the order calling the election and the date of declaration of the result thereof, both dates inclusive.

(*2*) The account shall contain such particulars as are specified in rule 67C.

(*3*) The total of the said expenditure shall not exceed such amount as may be notified by the State Co-operative Election Authority (SCEA).

(*4*) The Every contesting candidate at an election shall, lodge with the District Election Officer through the Returning Officer an account of his election expenses within the time and in the manner prescribed in rule 67C.

**"67B.** *Disqualification for failure of lodge account of election expenses.—* If the District Election Officer is satisfied that a candidate,—

(*a*) has failed to lodge an account of election expenses within the time and in the manner required by rules 67A and 67D; and

(*b*) has no good reason or justification for failure, the District Election Officer shall, submit report to the Director and after receipt of such report, the Director, after providing an opportunity of being heard to the candidate, shall by order declare him to be disqualified for being elected as, and for being, a member of the committee and any such person shall be disqualified for a period of three years from the date of the order.

**"67C.** *Particulars of account of election expenses.—* (*1*) The account of election expenses to be kept by a candidate or his election Agent under rule 67A shall contain the following particulars in respect of each item of expenditure from day to day, namely :—

(*a*) the date on which the expenditure was incurred or authorized;

(*b*) the nature of expenditure (as for example, traveling, postage or printing and the like);

(*c*) the amount of the expenditure :—

(*i*) the amount paid;

(*ii*) *the amount outstanding;*

*(d)* the date of payment;

*(e)* the name and address of the payee;

*(f)* the serial number of voucher, in the case of amount paid;

(*g*) the serial number of bills, if any, in case of amount outstanding;

(*h*) the name and address of the person to whom the amount outstanding is payable.

(*2*) Every contesting candidate shall lodge an account of election expenses within the period of sixty days from the date of declaration of the result of the election with the Returning Officer.

(*3*) All Vouchers shall be lodged along with the account of election expenses, arranged according to the date of payment and serially numbered by the candidate or his Election Agent and which serial numbers shall be entered in the account under item (*f*) of sub-rule (*I*).

(*4*) It shall not be necesary to give the particulars mentioned in item (*e*) of sub-rule (*1*) in regard to items of expenditure for which vouchers have not been obtained.

**67D.** *Notice by Returing Officer for inspection of accounts.*— The Returning Officer may, within two days from the date on which the account of election expenses has been lodged by a candidate under rule 67A, cause a notice to be affixed to his notice board, specifying :—

(*a*) the date on which the account has been lodged;

(*b*) the name of the candidate; and

(*c*) the time and place at which such account can be inspected.".

**11.** In FORM No. 7, appended to the principal rules, in clause 6, after sub-clause (*iii*), the following shall be added, namely :—

*Note.*—Clauses (*ii*) and (*iii*) shall not be applicable to the agriculturist who is contesting election under clause (*a*) of sub-section (*I*) of section 13, from the (A) Co-operative Societies' Constituency; or (B) Village Panchayat's Constituency.

**12.** After FORM No. 7, appended to the principal Rules, the following FORM No. 7A shall be inserted, namely :—

**" FORM No. 7A**
**(*See* rule 28(1))**
**Notice of withdrawal of Candidature**

Election to the ........................................................................ Agricultural Produce Market Committee, ......................................................... Taluka ................................. District ...................... form the ............................................... Constiuency,

**To,**

The Retuning Officer,

.......................................

I ............................................................................................................ a candidate at the above lection do hereby give notice that I withdraw my candidature.

Place : ..............................................................

Date : (Name of the Candidate)
Signature of Candidate,

This Notice was delivered to me at my office at ............................. (hour) on .....................(date), by ..............................(name), the * ................................

Date :

..............................................................

Signature of Returning Officer.

**Receipt for Notice of Withdrawal**

(To be handed over to the person delivering the notice)

The notice of Withdrawal of Candidature by ........................................................................ a candidate, at the election to the ............................................................... Agricultural Produce Market Committee, from ....................................................................... Constituency was delivered to me by *................................................................ at my office at ........................................................... (hour) on ................................. (date).

Date :

..............................................................

Signature of Returning Officer.

* Here insert one of the following alternatives as may be appropriate :—

(1) Candidate

(2) Candidate's proposer who has been authorized in writing by the candidate to deliver this notice.".

By order and in the name of the Governor of Maharashtra.

DR. SUGRIV SAMBHAJI DHAPATE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.